# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/०२/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०५/०२/२००५ रोजी सभा सुचना क्र. २३, दि. ०१/०२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी ०३.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ५) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १२) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १३) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३९ :-**

शिक्षण उपकर आकारणेबाबत.

**ठराव क्र. १५० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कलम १४८(अ) नुसार शिक्षण उपकर मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर जास्तीत जास्त ५% आकारण्याची तरतुद आहे. ही स्थायी समिती वार्षिक भाडे मुल्यावर ३% शिक्षण उपकर आकारणेंस मंजुरी देत आहे. सदरची कर आकारणी दि. ०१/०४/२००५ ह्या आर्थिक वर्षापासून आकारणेंस मान्यता देण्यांत येत असून मा. महासभेच्या मंजुरीस शिफारस आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. अनंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १३९ :-**

अग्निशमन दलाचे महसुली उत्पन्न वाढविणेबाबत.

**ठराव क्र. १५१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(सी), १२७(१), ६३(५) नुसार अग्निशमन कर मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर जास्तीत जास्त २% आकारण्याची तरतुद आहे. तसेच कलम २६३ व ३८६ प्रमाणे बांधकाम चालू असलेल्या इमारतीच्या व बांधकाम पूर्ण झालेल्या परंतु वापर परवाना प्राप्त न झालेल्या निवासी तसेच अनिवासी इमारतीस मंजुर क्षेत्रफळावर कॅपिटेशन फी आकारणे शक्य आहे. अग्निशमन दलाकडून सुरुवातीच्या वेळी देण्यांत येणाऱ्या नाहरकत दाखल्याच्या वेळेस सदर फी घेण्यांत येईल.

याचप्रमाणे वेळोवेळी केल्या जाणाऱ्या छाननीसाठी व हद्दीबाहेर देण्यांत येणाऱ्या सेवेसाठी आकरण्यांत येणाऱ्या फीचा आढावा घेऊन सोबतच्या तक्त्याप्रमाणे दर लावणे आवश्यक आहे. सोबत ठाणे महानगरपालिकेच्या मा. महासभेने केलेला ठराव व नवी मुंबई घेत असलेले दर जोडत आहे. उपरोक्त प्रस्तावित दर मान्य करण्यांत येत असून देण्यांत येत असून मा. महासभेच्या मंजुरीस शिफारस आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. अनंत पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००४-२००५ सुधारीत व सन २००५-२००६ चे मूळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती सभेची शिफारस करणेबाबत.

**ठराव क्र. १५२ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २००४/२००५ चे सुधारीत व सन २००५/२००६ चे मूळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून २००५/२००६ या वित्तीय वर्षात रक्कम रुपये **२.९७ लाख** इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजुरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| **तपशिल** | **२००४/०५** | **२००५/०६** |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क'' एकूण जमा + वृक्ष प्राधिकरण एकुण जमा | १८१७६.५३ | २५८५५.३४ |
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क'' एकूण जमा + वृक्ष प्राधिकरण एकुण खर्च | १८२७१.९१ | २५८५२.३७ |
| अखेरची शिल्लक | ५.०१ | २.७९ |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. अनंत पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**